


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com

Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : २४६ वा मंगळवार दि २ नोव्हेंबर २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# बोगस दिव्यांगांवरील कारवाईचे नेमके झाले तरी काय?

## तुकाराम मुंढेसारखा कर्तव्यदक्षपणा बुलढाण्यातील अधिका-यांमध्ये का नाही?

**जनसंचलन/बुलढाणा**

दिव्यांगत्वाचे बोगस प्रमाणपत्र प्राप्त करून शासकीय नोकरीतील विविध प्रकारचे लाभ उपटणा-यांवर यवतमाळ जिल्ह्यात कारवाईचा बडगा उगारला गेलेला आहे. राज्याच्या प्रशासकीय सेवेत अत्यंत प्रामाणिक व कर्तव्यकठोर समजल्या जाणा-या तुकाराम मुंढे यांनी ही कारवाई केली आहे. मात्र बुलढाण्यातदेखील मोठ्या संख्येने बनावट दिव्यांग असूनही कुणावरही अद्याप कारवाई करण्यात आलेली नाही. यामुळे बुलढाण्यातील अधिकारी तुकाराम मुंढे यांच्याप्रमाणे कर्तव्यदक्ष नाहीत का,असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे. जिल्ह्याच्या विविध शासकीय खात्यांमध्ये बोगस दिव्यांग प्रमाणपत्र प्राप्त करून शासकीय योजना लाटणा-या कर्मचा-यांच्यासंदर्भात दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज गेल्या अनेक महिन्यांपासून सातत्याने वृत्तमालिका प्रकाशित करून या ठिकाणी झालेल्या प्रचंड मोठ्या घोटाळ्यावर प्रकाश टाकण्याचे काम करीत आहे. या भ्रष्टाचारात येथील जिल्हा सामान्य रुग्णालयातील काही महाभ्रष्टाचारी देखील जबाबदार आहेत. कारण जिल्हा रुग्णालयात पावलोपावली भ्रष्टाचारी बसलेले आहेत आणि त्या ठिकाणी बसून ते यथेच्छ भ्रष्टाचा करीत आहेत. कोणाही दिव्यांग व्यक्तीला आपले दिव्यांगत्व शासकीय स्तरावर सिद्ध करण्यासाठी दिव्यांग समितीकडून प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे लागते. त्यासाठी त्यांना येथील जिल्हा रुग्णालयातील दिव्यांग मंडळाकडे रितसर अर्ज करावा लागतो. या ठिकाणी स्थिती अत्यंत गंभीर आहे. कारण या दिव्यांग मंडळाला भ्रष्टाचाराने पुरते पोखरून टाकले आहे. या दिव्यांग मंडळाकडून ख-या दिव्यांगांना प्रमाणपत्रासाठी झुलवले जाते, मात्र जे बोगस दिव्यांग आहेत त्यांच्याकडून चिरीमिरी घेऊन त्यांना प्रमाणपत्र दिले जाते. याचा लाभ शासकीय नोकरीतील अनेकांना लाटला.जे दिव्यांग नाहीत अशांना मोठ्या प्रमाणात दिव्यांग मंडळाच्या भ्रष्ट अधिका-यांशी अर्थपूर्ण साटेलोटे करून दिव्यांग प्रमाणपत्र मिळवले व त्याच्या जोरावर विविध प्रकारचे शासकीय सेवेचे लाभ उपटले. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजला प्राप्त झालेल्या माहितीनुसार जिल्ह्यात बोगस दिव्यांग कर्मचा-यांची संख्या ही ५०० हून अधिक आहे.ही सर्व माहिती यापूर्वी झालेल्या चौकशीत व तपासणीत स्पष्टपणे उघड झाली आहे. काही महिन्यांपूर्वी यासंदर्भात सर्व दिव्यांग कर्मचा-यांची तपासणी करण्याचे आदेश २ वेळा निघाले देखील होते. परंतु या प्रकरणात सातत्याने अर्थपूर्ण घडामोडी होतात आणि हा मुद्दा परत-परत बाजूला पडतो. या सर्व प्रकारातून एक बाब सिद्ध होते की, बोगस दिव्यांना जिल्ह्यातील वरिष्ठ अधिका-यांकडून अभय मिळत




असून, या द्वारे एक प्रकारे भ्रष्टाचाराला खतपाणी घातले जात आहे. हा भ्रष्टाचार रोखण्याची कोणातही हिम्मत नाही का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.यवतमाल येथील तक्रारींवर कर्तव्यात असलेले अधिकारी तुकाराम मुंढे यांनी अशाच बोगस दिव्यांगाची तपासणी केली असून, त्यामध्ये त्यांनी तब्बल २१ बोगस दिव्यांग कर्मचा-यांवर निलंबनाची कारवाई केली आहे. याच धरतीवर बुलढाण्यातही कारवाई होण्याची आवश्यकता आहे.मात्र तुकाराम मुंढे यांच्यासारखे कर्तव्यदक्ष अधिकारी नसल्यामुळे बुलढाण्यात अशी कारवाई होत नसल्याचे आता अनेक जण उघडपणे बोलू लागले आहेत.कमीत कमी आपली कर्तव्यदक्षता सिद्ध करण्यासाठी जिल्ह्यातील वरिष्ठ अधिका-यांनी दिव्यांगांचे बोगसपणे लाभ लाटणा-या अधिका-यांवर कारवाई करावी. वरिष्ठ अधिकारी जरी या गैरप्रकाराकडे दुर्लक्ष करीत असले, तरी दैनिक जनसंचलन वसिटी न्यूज मात्र हा मुद्दा सातत्याने लावून धरणार आहे.जोपर्यंत सर्व बोगस दोषी दिव्यांग निलंबित केले जात नाही, तोपर्यंत प्रशासनाला जागे करण्याचे काम दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज सातत्याने करीत राहणार आहे.

# लाखो भारतीयांच्या आरोग्याला धोका! ऑरामाईनवरून ठाकरेंच्या खासदाराचं केंद्राला पत्र...


**वृत्तसंस्था/ नवी दिल्ली**

भाजलेल्या चण्यांसह अनेक खाद्य पदार्थांमध्ये रंगासाठी वापरल्या जाणाऱ्या धोकादायक औद्योगिक डायच्या होणाऱ्या बेकायदेशीर वापराचा विषय राज्यसभेत उपस्थित करण्यात आला आहे. शिवसेना उबाठाच्या खासदार प्रियंका चतुर्वेदी यांनी यांनी यासंदर्भात केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा आणि खाद्य प्रक्रिया मंत्री चिराग पासवान यांना पत्र लिहिलं आहे. लाखो लोकांच्या आरोग्यास असलेला धोका लक्षात घेऊन तात्काळ कारवाईची मागणी करण्यात आली आहे. शिवसेना उबाठाच्या राज्यसभेच्या खासदार प्रियंका चतुर्वेदी यांनी केंद्राला लिहिलेल्या पत्रात एका अहवालाचा संदर्भ दिला आहे. नुकत्याच हाती लागलेल्या पुराव्यांनुसार ऑरामाईन एक औद्योगिक डाय आहे. याचा वापर कपडे आणि लेदरसाठी केला जातो. रंग वाढवण्यासाठी याच डायचा वापर भाजलेल्या चण्यांमध्ये बेकायदेशीरपणे केला जात आहे. ऑरामाईन भाजलेल्या चण्यांमध्ये मिसळलं जात आहे, असं चतुर्वेदी यांनी पत्रात नमूद केलं आहे. चण्यात होत असलेला ऑरामाईन डायचा वापर केवळ खाद्यपदार्थ सुरक्षा नियमांचं उल्लंघन नाही, तर तो लाखो भारतीय नागरिकांच्या आरोग्यासाठी धोका आहे. एफएसएसएआयला नियमन करण्यात अपयश येत आहे. अन्नपदार्थ सुरक्षा आणि दर्जा कायदा २००६ च्या अंतर्गत ऑरामाईनवर पूर्णपणे बंदी आहे. ऑरामाईनमुळे कर्करोग होण्याचा धोका असल्याचं इंटरनॅशनल एजन्सी फॉर रिसर्च ऑन कॅन्सरचा अभ्यास सांगतो. ऑरामाईनमुळे किडनी, यकृत, स्वादुपिंडाशी संबंधित त्रास होऊ शकतात. ऑरामाईनचे अनेक धोके असतानाही या डायचा सर्रास वापर केला जात आहे. भेसळ केली जात आहे. बाजारात उपलब्ध असलेल्या अनेक खाद्यपदार्थांमध्ये याचा वापर झालेला आहे, अजूनही होत आहे. प्रशासनाकडून नियमित तपासण्या होत नाहीत. यासाठी नेमकं उत्तरदायी कोण तेदेखील स्पष्ट नाही, याकडे खासदार चतुर्वेदी यांनी लक्ष वेधलं. खाद्य सुरक्षा नियमनाची जबाबदारी असलेल्या एफएसएसएआयवर खासदार चतुर्वेदी यांनी प्रश्न



उपस्थित केले आहेत. एफएसएसएआय नियमन करण्यात कमी पडत असल्याचं स्पष्टपणे दिसून येत आहे, असं चतुर्वेदी यांनी पत्रात नमूद केलं आहे. कफ सिरप खराब असल्यानं झालेले मृत्यू ताजे आहेत. त्यामुळे सरकारनं आरोग्याला प्राधान्य द्यावं. या प्रकरणी तातडीनं तपासण्या व्हाव्यात आणि दोषींवर कारवाई करावी,

# अमेरिकेचा वर्चस्ववाद




दक्षिण मध्य रेल्वेचे शेवटचे टोक असलेल्या नांदेड विभागातील छत्रपती संभाजीनगर ते परभणी रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरणाला केंद्र सरकारने मंजुरी दिली. १७७.२९ किलोमीटरच्या मार्गासाठी २ हजार १७९ कोटी रुपये निधीची घोषणाही झाली. ब्रॉडगेज, रेल्वेगाड्यांचा विस्तार, स्थानकांमध्ये सुविधांच्या पूर्ततेसाठी मराठवाड्यातील जनतेने आंदोलनांच्या अनेक लढाया लढल्या. कित्येक वर्षे छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, नांदेड; तसेच हिंगोली या पाच जिल्ह्यांना रेल्वेसुविधेचा लाभ मिळत होता. लातूर, धाराशिव व बीड गेल्या काही वर्षांत जोडले गेले. मात्र, रेल्वे मार्गाची एकल लाइन पुढच्या सुविधा मिळण्यासाठी अपुरी होती. परभणी - मुदखेड ८१ किलोमीटर रेल्वेमार्गाचे दुहेरीकरण झाले आहे. अंकाई - छत्रपती संभाजीनगर मार्गाच्या दुहेरीकरणाचे काम सुरू आहे. २०२३ मध्ये या कामाला मंजुरी मिळून ९६० रुपयांचा निधी मंजूर केला होता. आता नव्या टप्प्याची मंजुरी मिळाली. दुहेरीकरणाचे प्रत्यक्ष लाभ टप्प्याटप्प्याने दिसायला लागतील. प्राथमिक टप्प्यात छत्रपती संभाजीनगर-मनमाड दुहेरीकरणामुळे मुंबईच्या प्रवासाच्या वेळेत एक तासाची बचत होईल. या मार्गावरील रेल्वेगाड्यांची संख्या वाढेल. सुविधांमध्ये वाढ होईल. प्रवासी, पर्यटनासाठी लाभ होईलच; शिवाय उद्योगांसाठी दुहेरीकरण लाभदायी ठरेल. मुंबईहून दक्षिणेतील विशाखापट्टणम टप्प्याकडे मराठवाड्यातून जाण्यासाठी नवा सुलभ पर्याय उपलब्ध होईल. मुदखेड-परभणी, अंकाई-छत्रपती संभाजीनगर असे दुहेरीकरणाचे दोन टप्पे होताना मधल्या टप्प्याला मंजुरी मिळावी, म्हणून परभणी-छत्रपती संभाजीनगर दुहेरीकरणासाठी प्रयत्न सुरू होता. या मंजुरीनंतर छत्रपती संभाजीनगर, जालना व परभणीत जमीन संपादनाची अधिसूचना दक्षिण मध्य रेल्वे प्रशासनाने काढली आहे. त्यामुळे काम वेळेत पूर्ण होण्याची आशा आहे. पुढील काळात मुंबईहून हैदराबाद, विशाखापट्टणम, गुंटूरला पोहोचण्यासाठी हा मार्ग फायद्याचा ठरेल. मुदखेड ते बोलाराम (तेलंगण) दुहेरीकरण झाले तर मनमाड ते सिकंदराबाद दुहेरीकरण पूर्ण होईल. मुंबईतून दक्षिणेकडे जाणाऱ्या अनेक गाड्या या मार्गे जाऊ शकतात. भविष्यात मनमाड-सुरत गुजरातची दक्षिणेशी कनेक्टिव्हिटीफ होईल. अंकाई-छत्रपती संभाजीनगर-परभणी रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणामुळे गाड्यांची संख्या वाढेल. सध्या पन्नासपेक्षा अधिक रेल्वेगाड्या एकेरी मार्गावर धावतात.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# माझ्या छातीवर वर्षभरात असंख्य वार झाले

**बीड :** राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा राज्याचे माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी आज परळीत केलेलं भाषण चर्चेला कारण ठरत आहे. परळी नगर परिषदेच्या निवडणुकीसाठी आज महायुतीची परळीत प्रचारसभा आयोजित करण्यात आली. या प्रचारसभेला धनंजय मुंडे यांच्यासह भाजप नेत्या पंकजा मुंडे या देखील उपस्थित होत्या. या प्रचारसभेत धनंजय मुंडे यांनी नाव घेता वाल्मिक कराडचा उल्लेख केल्याची चर्चा आहे. 'आपला एक सहकारी आज आपल्यात नाही. काय चुकलं, काय नाही ते न्यायालय बघेल', असं वक्तव्य धनंजय मुंडे यांनी केलं. तसेच आपल्यावर वर्षभरात असंख्य वार झाल्याचं वक्तव्य देखील धनंजय मुंडे यांनी केलं.आम्ही परळीच्या विकासासाठी आजपर्यंत आम्ही कधीच कमी पडलो नाही. परळीच्या विकासाबाबत आमचं एक व्हिजन आहे. आता समोरच्यांचं व्हिजन काय असेल?




समोरच्याचं नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराचं व्हिजन काय असेल? अचानक निवडणूक लागायच्या आधीच माणूस बिचकला. तसेच तुतारी घेऊनच आला. मला त्याबद्दल बोलायचं नाही. पण असे वार माझ्या जीवनात अनेकांनी केले', अशी खंत धनंजय मुंडे यांनी व्यक्त केली.'एक वर्षापासून मी सहन केलं. मी काय सहन केलंय ते मला फक्त एकट्याला माहिती आहे. जीवनात गेल्या वर्षभरात एवढे वार माझ्या छातीवर झाले. एवढे वार होऊनही मी थोडाही डगमगलो नाही. कारण सर्व शक्ती तुमची माझ्या पाठिमागे होती. ज्यांनी माझी मदत घेऊन आज दगाफटका केला असेल त्यांना फक्त एवढंच सांगणं आहे, केलेली मदत विसरले आहेत. त्यांना अवकातीत आणावं लागेल. अनेक जण आपली हद्द विसरले आहेत. परळीत यायचं, उटसूट कसेही आरोप करायचे. या गोष्टीच्या मला वेदना नाही झाल्या? हो मला माहिती आहे. परळीत काय, परळी हे असं, ते असं', असं धनंजय मुंडे म्हणाले. अरे काय, किती सहन करायचं? ते सहनही केलं. गप्प राहिलो. कारण शेवटी संयम महत्त्वाचा असतो. आपण सर्वांना तशा पद्धतीने ताकद उभी केली. ती ताकद उभ्या महाराष्ट्राला त्या काळात दिसली नाही. पण आपल्याला या निवडणुकीच्या माध्यमातून, सर्वच्या सर्व उमेदवार ऐतिहासिकपणे निवडून आणून, या उभ्या महाराष्ट्राला दाखवायचं आहे. ज्या ज्या वेळेला आपल्याला खवळलंय, आपण कुणाला खवळत नाही. ज्यांनी ज्यांनी खवळलंय, त्यांना हे उत्तर आपल्याला द्यायचं आहे. मग आपल्यातलेे मतभेद असतील, कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांमधील, माझ्या सहकाऱ्यांमध्ये मतभेद असतील'.मला माहिती आहे की ते कसे मतभेद आहेत. आजपासून त्यांच्या घरी जाण्याचं आणि मनधरणी करण्याचं काम करणार आहे. जाऊदे बाबा चल. सगळ्या गोष्टी होणार आहे. माझ्या जे काम ते चोख करणार आहे. माझ्यापेक्षा जास्त चोख काम महायुतीचे सहकारी करणार आहेत. मतदारांच्या दारापुढे जावून डोकं ठेवायचं. विजय ऐतिहासिक करायची जबाबदारी पंकजा ताई आणि माझी आहे हे वचन द्यायचं आहे.'

## ठाकरेंच्या ११ उमेदवारांची ऐनवेळी निवडणुकीतून माघार

**लातूर :** लातूर जिल्ह्यातील रेणापूर नगरपंचायतीच्या निवडणुकीत शिवसेना (ठाकरे गट) ला मोठा धक्का बसला आहे. पक्षाचे नगराध्यक्षपदासह एकूण १६ पैकी तब्बल ११ उमेदवार ऐन निवडणुकीच्या ऐन भरातून माघार घेऊन तटस्थ राहिले आहेत. पक्षाकडून पुरेसे सहकार्य मिळत नसल्याची भावना या उमेदवारांनी व्यक्त केली आहे. शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांनी पूर्ण ताकदीने निवडणूक लढवण्याचे आदेश दिले होते, मात्र पक्षांतर्गत अडथळ्यांमुळे हा निर्णय घेण्याची वेळ आल्याचे माघार घेतलेल्या उमेदवारांचे म्हणणे आहे.२०१६ मध्ये स्थापन झालेल्या रेणापूर नगरपंचायतीच्या २०१७ च्या पहिल्या निवडणुकीत भाजपने एकहाती सत्ता मिळवली होती. आताच्या निवडणुकीत भाजप, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट), शिवसेना (शिंदे गट), काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस



शरद पवार गट असे चौरंगी लढतीचे चित्र होते. मात्र, ठाकरे गटाच्या ११ उमेदवारांनी माघार घेतल्याने निवडणुकीत आता वेगळीच रंगत आली आहे. या निर्णयामुळे रेणापूरच्या राजकारणात मोठे वादळ उठले असून, या माघारीचा फायदा कोणाला होणार आणि कोणाला तोटा होणार, याचे गणित आता लावले जात आहे. राजकीय वर्तुळात अशी चर्चा आहे की, लातूर ग्रामीणचे माजी आमदार आणि काँग्रेस नेते धीरज देशमुख यांनी भाजपला आव्हान देण्यासाठी शिवसेनेला कमकुवत केले आहे.

## शिंदेंसोबत फडणवीस यांच्या दुराव्याची चर्चा

**मुंबई :** 'उपमुख्यमंत्री आणि शिवसेना प्रमुख एकनाथ शिंदे आणि माझ्यात कुठलाही दुरावा निर्माण झाला नाही, तो माध्यमांनी निर्माण करण्याचा प्रयत्न केला; पण ते तोंडावर पडल्याशिवाय राहणार नाहीत', असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. विविध कार्यक्रमांच्या निमित्ताने रविवारी ते शहरात आले असता माध्यम प्रतिनिधींशी ते बोलत होते.शिवसेना नेते एकनाथ शिंदे आणि भाजप यांच्यात दुरावा निर्माण झाल्याचे चित्र काही दिवसांपासून राज्यात निर्माण झाले आहे. शिंदे यांनी दिल्लीत जाऊन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतल्याने नाराजीच्या चर्चेत आणखी भर पडली.देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांच्या दिव्यज फाउंडेशनने आयोजित कार्यक्रमात फडणवीस आणि शिंदे एकत्र आलेले पाहायला मिळाले होते, मात्र दोघांमध्ये अबोला असल्याची चर्चा पुन्हा रंगली होती. विशेष म्हणजे एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्यात दोन खुर्च्यांचे



अंतर दिसल्याने कुजबूज सुरु झाली होती.यावेळी 'तुमच्यात आणि शिंदे यांच्यात दुरावा आहे का', असा प्रश्न केला असता फडणवीस म्हणाले, 'आम्हा दोघांत कुठलाही दुरावा नाही, आम्ही आज आणि काल व त्यापूर्वीही परस्परांशी बोललो, एकत्र कार्यक्रमात सहभागी झालो होतो. ते कुठे जाणार याची मला माहिती आहे आणि मी कुठे जाणार हे त्यांना मी सांगितले आहे. कुठलाही दुरावा नाही, फक्त माध्यमांनी तसे चित्र निर्माण केले आहे. काही फुटेज दाखवून ते दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत आहेत. पण ते तोंडावर पडल्याशिवाय राहणार नाही. हा वेड्यांचा बाजार सुरू आहे. यामध्ये काही माध्यमे वेडी झाली आहेत', अशी खोचक टीकाही त्यांनी केली.उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांनी आम्हाला मते दिली नाहीत तर निधी दिला जाणार नाही, अशी धमकी मतदारांना दिली, याकडे फडणवीस यांचे लक्ष वेधले असता ते म्हणाले, 'असे काहीच नाही. आम्ही संपूर्ण महाराष्ट्राचाच विकास करणार आहोत. राजकारणात व जाहीर सभेत असे बोलावेच लागते, पण त्याचा अर्थ तसा नाही', असे फडणवीस म्हणाले.

## 'बिनविरोध निवडणुकीसाठी उमेदवारांना २० लाख रुपये दिले'

**बारामती :** बारामतीत सध्या नगर परिषदेच्या निवडणुकीवरुन राजकीय वातावरण तापलं आहे. विशेष म्हणजे या निवडणुकीतही काका-पुतण्या यांच्यात संघर्ष बघायला मिळत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुतणे तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवा नेते युगेंद्र पवार यांनी गंभीर आरोप केले आहेत. बारामती नगर परिषदेच्या निवडणुकीत राष्ट्रवादीच्या ८ नगरसेवकांची बिनविरोध निवड झाली आहे. पण यावरुन युगेंद्र पवार यांनी अतिशय गंभीर आरोप केले आहेत. ज्या ठिकाणी बिनविरोध निवड झाली तिथे आठ पैकी चार ठिकाणी आपल्या उमेदवारांना अर्ज मगे घेण्यासाठी प्रत्येकी २०-२० लाख रुपये देण्यात आले, असा मोठा आरोप युगेंद्र पवार यांनी केला. तसेच आपल्या पक्षाच्या सर्वच उमेदवारांवर सत्ताधारी पक्षाकडून मोठा दबाव असल्याचा दावा युगेंद्र पवार यांनी केला आहे.आठ पैकी साधारण चार जागांवर आमचे उमेदवार होते आणि एका-एकाला त्यांनी २० लाख रुपये दिले, अशी चर्चा लोकांमध्ये आहे. आमचे उमेदवार सर्वसामान्य घरातील आहेत. कष्ट करणारे आहेत. १० वर्ष जरी त्यांनी कष्ट केले तरी त्यांना २० लाख रुपये कमवता येणार नाहीत',

### युगेंद्र पवार यांचा आरोप



असा मोठा दावा युगेंद्र पवार यांनी केला.एवढे सहज ते येतात आणि २० लाख, २५ लाख जो काही आकडा असेल तो देऊन या चार लोकांना त्यांनी फोडलं. त्यापैकी दोन उमेदवार नवीनच आपल्याकडे आलेले आहेत. ते कुठल्याही पक्षांमध्ये नव्हते. त्यांनी आम्हाला सांगितलं, तुम्ही जर आम्हाला संधी दिली तर आम्ही चांगलं काम करून दाखवू. आम्हाला वाटलं त्यांच्यावर विश्वास ठेऊ ते चांगलं काम करतील', असं युगेंद्र पवार यांनी सांगितलं.पैशांचा वापर मोठ्या प्रमाणात केला गेला. आमचे उमेदवार हे सर्व छोटे व्यवसायिक आहेत. आपण उच्च शिक्षित, उच्च प्रतिमा असलेले तरुण, सामाजिक कुटुंबातील उमेदवार आपण दिलेले आहेत. पण त्यांनी दबाव आणला. शेवटी लोक भितात. आमच्या पुढे खूप मोठी शक्ती आहे. आज त्यांच्याकडे सत्ता आहे, पैसा आहे, संस्था आहेत. हे सगळे तिथे काम करत असतात. त्यांच्यावर दबाव आणला जात असेल तर मग दोन-तीन लोक जाणार हे साहजिक आहे. शेवटी लहान माणसाला भीती वाटते. जो सामान्य घरातला असतो तो तिथे घाबरून जातो', असं युगेंद्र पवार म्हणाले.आज पण आमच्या उमेदवारांवर प्रचंड दबाव आणला जात आहे. लोकसभेला विधानसभेलाआपल्याला बघायला मिळालं. आता नगरपालिकेच्या निवडणुकीत देखील बघायला मिळत आहे. सर्व बारामतीकरणांनी विनंती आणि आवाहन करीन की, या वेळेला तुम्ही सामान्य घरातील लोकांना त्या ठिकाणी संधी एकदा देऊन बघा. हे पण उच्चशिक्षित आहेत. लोकांमध्ये राहतात. जर लोकशाही जिवंत ठेवायची असेल, चांगला मजबूत विरोधी पक्ष जिवंत ठेवायचा असेल तर मग राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या उमेदवाराला तिथे निवडून द्या', असं आवाहन युगेंद्र पवार यांनी केलं. आम्हाला पण वाटायचं आपण एकत्र येतोय की काय कारण अशी चर्चा खाली पेरली जात होती. लोकांची दिशाभूल करण्यासाठी अशी चर्चा केली जाते, अफवा पसरली जाते. मग लोकांना वाटतं, का ह्या भानगडीत पडायचे? हे एकच आहेत. पण तसं अजिबात नाही. शरद पवार यांचा पक्ष हा मूळ राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष वेगळा आहे आणि पलीकडचा पक्ष हा वेगळा आहे', असं युगेंद्र पवार यांनी स्पष्ट केलं.

नगरपालिका स्थापन झाल्यापासून पहिल्यांदाच त्यांना हे करावं लागलं. कारण ते १२ नगरसेवकांसाठी प्रयत्न करत होते. २५ लाख रुपये कशाला म्हणतात? एवढे सगळे पैसे तर सगळ्या उमेदवारांकडे मिळून आमच्याकडे नाहीत. पण ते एवढे पैसे एका उमेदवाराला देत आहेत', असा आरोप युगेंद्र पवार यांनी केला. 'नगरपरिषद स्थापन झाल्यापासून त्यांना पहिल्यांदा हे असं करावं लागतंय. म्हणजे तुम्ही राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार साहेबांची ताकद आणि सर्वसामान्य जनतेचे प्रेम ओळखून घेतली पाहिजे', असंही युगेंद्र पवार म्हणाले.

# पत्नीने रातोरात उरकले पतीचे अंत्यसंस्कार; पोलिसांना शंका, पुरलेली बॉडी काढली अनब मृत्यूचं गूढ उकललं



**गुजरात :** वडोदऱ्यातील टांदळजा परिसरात पाच दिवसांपूर्वी झालेल्या खुनाच्या प्रकरणाचा काल पोलिसांनी उलगडा केला आहे. ३२ वर्षीय इर्शाद बंजारा यांच्या हत्येप्रकरणी पत्नी गुलबनू बंजारा (२५) हिला रविवारी अटक करण्यात आली असून तिचा प्रियकर तौसीफ आणि आणखी एक साथीदार मामा फरार आहेत.हत्येनंतर गुलबनूने पतीचा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्यानेआल्याचा दावा केला होता. मात्र, अंत्यसंस्काराच्या दिवशी तिचे सततचे फोनकॉल आणि वागण्यातले बदल पाहून पतीच्या कुटुंबाला संशय आला. मोबाईल तपासणीदरम्यान एका विशिष्ट क्रमांकावरचे लांब कॉल आढळल्यानंतर कुटुंबाने २१ नोव्हेंबर रोजी गझ रोड पोलिसांकडे सखोल चौकशीची मागणी केली. आवश्यक परवानग्या घेऊन पोलिसांनी रविवारी सकाळी मजिस्ट्रेटच्या उपस्थितीत इर्शादचे शव बाहेर काढून पोस्टमॉर्टेम केले. यात गळा आवळून हत्या झाल्याचे स्पष्ट झाले, आणि लगेच गुलबनू, तिचा प्रियकर तौसीफ आणि मामा यांच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. तपासात समोर आले की गुलबनू आणि तौसीफ यांच्यातील संबंधाला जवळपास एक वर्ष झाले होते. पळून जाण्याचा विचार सोडल्यानंतर दोघांनी इर्शादचा खून करण्याचा निर्णय घेतला. तिघे गेल्या तीन महिन्यांपासून योजनेवर काम करत होते. १८ नोव्हेंबरच्या रात्री गुलबनूने इर्शादच्या जेवणात अज्ञात पदार्थ मिसळून त्याला बेशुद्ध केले. रात्री उशिरा तौसीफ आणि मामा घरात घुसले. त्यांनी सुरुवातीला हाताने गळा आवळण्याचा प्रयत्न केला, पण इर्शाद झुंज देत असल्याने आवाज झाला. मुलं जागी होतील या भीतीने गुलबनूने स्वतःचा दुपट्टा दिला, ज्याचा वापर करून दोघांनी इर्शादचा गळा आवळला आणि घरातून पळ काढला. घटनानंतर पहाटे ३ वाजता गुलबनूने इर्शादच्या कुटुंबीयांना 'अस्वस्थ वाटत आहे' असा फोन केला. रुग्णालयात नेण्याचा सल्ला नाकारत ती म्हणाली की तो आता ठीक आहे.

सकाळी इर्शाद मृतावस्थेत आढळला आणि त्याच दिवशी अंत्यसंस्कार करण्यात आला.गुलबनू आणि इर्शाद यांना सहा वर्षांचे लग्न झाले असून तीन लहान मुले आहेत. इर्शाद कॅज्युअल लेबरर होता, तर तौसीफ उत्तर प्रदेशातीलमूळ गावी राहणारा टेलर आहे. पोलिसांनी तौसीफ आणि मामाचा शोध घेण्यासाठी विशेष पथके तयार केली असून दोघेही मुंबईत लपल्याची शक्यता व्यक्त केली आहे. पुढील तपास सुरु आहे.

## लग्नाच्या आमिषाने पुण्यात १३ वर्षांच्या मुलीला पळवून नेलं

**पुणे :** लग्नाच्या आमिषाने अल्पवयीन मुलीला पळवून नेणाऱ्या तरुणाचा महिनाभर पुणे- हैदराबाद- उत्तर प्रदेश असा पाठलाग करून फुरसुंगी पोलिसांनी शोध लावला. मुलीची सुखरूप सुटका केली असून, आरोपी तरुण आणि त्याच्या सावत्र आईला अटक करण्यात आली आहे.रमेश मसनाजी पिट्टलवाड (वय २५, रा. धगनगर वस्ती, उरुळी देवाची, मूळ रा. नांदेड) आणि मुक्ताबाई मसनाजी पिट्टलवाड (३५, रा. साखरे वस्ती, हिंजवडी) अशी दोघांची नावे असून, त्यांच्या विरोधात फुरसुंगी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पुण्यात राहत असताना रमेशची १३ वर्षीय मुलीसोबत ओळख झाली होती. त्याने लग्नाचे आमिष दाखवून तिला पळवून नेले. या कृत्यात त्याची सावत्र आई मुक्ताबाई हिने मदत केली. तिने 'हैदराबादच्या नातेवाइकांकडे जा,' असे रमेशला सांगून प्रवास खर्चासाठी पैसेही दिले. त्यानुसार रमेश आणि मुलगी रेल्वेने हैदराबादला गेले.मुलगी बेपत्ता झाल्याची तक्रार कुटुंबीयांनी फुरसुंगी पोलिसांकडे केली. पोलिसांनी तत्काळ अपहरणाचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. रमेश हैदराबादमध्ये असल्याची माहिती मिळाल्याने पोलिसांनी मुक्ताबाईला ताब्यात घेऊन चौकशी केली. तिने दोघे हैदराबादला गेल्याची कबुली दिली. मात्र, पोलिस पोहोचण्यापूर्वीच रमेश मुलीसह तेथून पसार झाला होता.तांत्रिक विश्लेषण आणि बातमीदारांच्या माहितीच्या आधारे उत्तर प्रदेशातील बामणौली (ता. बडोत, बागपत) येथे रमेश असल्याचे समोर आले. वरिष्ठ निरीक्षक अमोल मोरे आणि गुन्हे निरीक्षक राजेश खांडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक नानासाहेब जाधव यांच्या पथकाने उत्तर प्रदेशात धाव घेतली.स्थानिक पोलिसांच्या मदतीने चार दिवस शोधमोहीम राबवून रमेशला पकडले. मावशीकडे राहणाऱ्या आरोपीला ताब्यात घेऊन पुण्यात आणले आणि मुलीची सुटका केली.

## ५ वर्षीय चिमुकलीवर नात्यातीलच नराधमाकडून अत्याचार

**बीड :** एका साडेपाच वर्षांच्या चिमुकलीवर तिच्या नात्यातीलच एका व्यक्तीने लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.या घटनेपेक्षाही अधिक धक्कादायक बाब म्हणजे, या नराधमावर गुन्हा दाखल होऊ नये यासाठी गावातील लोकांनी पीडित मुलीच्या आईवर प्रचंड दबाव आणल्याचा आरोप आहे. बदनामीच्या भीतीने ग्रामस्थांनी चक्क बैठका घेऊन गुन्हा दडपण्याचा प्रयत्न केला, ज्यामुळे पीडित मुलीला तब्बल चार दिवस उपचारासाठी रुग्णालयात जाऊ दिले नाही, असा संतापजनक प्रकार प्राथमिक तपासात उघड झाला आहे.११ नोव्हेंबर रोजी ही अत्याचाराची घटना घडली. घटनेनंतर मुलीला असह्य वेदना होत असतानाही ग्रामस्थांनी 'गावाची बदनामी नको' या कारणास्तव पीडित कुटुंबाला उपचारासाठी बीड येथे जाण्यास मज्जाव केला. चार दिवस त्रास सहन केल्यानंतर मुलीच्या नात्यातील काही व्यक्तींना ही घटना समजली.

## वाटणीमध्ये कमी हिस्सा भेटला, जवळच्याच व्यक्तीनं घात केला

**रायगड :** रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील मोठे भोम गावात ९ नोव्हेंबर रोजी घडलेली ९० वर्षीय हिराबाई जनार्दन जोशी यांच्या मृत्यूच्या गूढ घटनेत पोलीस तपासात अत्यंत धक्कादायक वळण घेत आहे. सुरुवातीला ही नैसर्गिक मृत्यूची घटना मानली जात होती. मात्र, उरण पोलिसांनी घटनास्थळी सापडलेल्या पुराव्यांचा अभ्यास व प्राप्त पोस्टमार्टम अहवालाच्या आधारे हा मृत्यू बेदम मारहाणीचा परिणाम असल्याचं स्पष्ट केलं आहे. हिराबाईच्या शरीरावर अनेक ठिकाणी गंभीर जखमा आढळल्या तर त्यांच्या घरातून लाकडी पट्ट्या व दांडेही जप्त करण्यात आले, ज्यांचा वापर हल्ल्यात झाल्याचा निष्कर्ष तपासात निघाला.हिराबाई जोशी घरी एकट्याच राहत होत्या. अलीकडेच त्यांना जमिनीचे सुमारे १५ लाख रुपये मिळाले होते. त्या पैशांपैकी काही रक्कम त्यांनी आपल्या मुलींना दिली होती. तथापि, पैशांच्या या व्यवहारामुळे त्यांचा जावई सुरेश पाटील (वय ४९) याच्या मनात



लोभ वाढला. त्याने सासूबाईकडे आणखी पैशांची मागणी केली होती. हिराबाई यांनी नकार दिल्याने संतापून त्याने त्यांच्या राहत्या घरात घुसून लाकडी दांड्याने त्यांच्यावर निर्दयी प्रहार केले. या मारहाणीमुळेच त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झालापोलिसांनी केलेल्या तपासातून आरोपीवर संशय गेला आणि त्याला काही तासांतच ताब्यात घेण्यात आलं. चौकशीत सुरेश पाटीलने गुन्ह्याची कबुली दिली आहे. त्याला न्यायालयात हजर केले असता ४ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

# सिगारेट पेटवायला लायटर दे रे...', परत मागण्यावरुन वाद चिघळला, पिकनिकसाठी आलेल्या तरुणावर वार करत हत्या

**नागपूर :** जिल्ह्यातील खापरखेडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बिना संगम नदी घाट परिसरात काल रविवारी संध्याकाळी चाकू हल्ल्याची धक्कादायक घटना समोर आली. या हल्ल्यात ३३ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला असून दुसरा तरुण गंभीर जखमी आहे. रविवारच्या सुट्टीचा आनंद घेण्यासाठी पिकनिकसाठी गेलेल्या युवकांवर झालेल्या या हल्ल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, पिवळी नदी परिसरात राहणारा आशिष रोशन गोंडाणे (वय ३३) हा आपल्या दोन मित्र सचिन पुनीमहेश मिश्रा आणि सुशीलकुमार मोतीराम गेडाम यांच्यासह रविवारी दुपारी पिकनिकसाठी



बिना संगम नदी घाट परिसरात पोहोचला होता. दुपारी २.३० वाजता तेथील वातावरणाचा आनंद घेतल्यानंतर सचिन मिश्रा हा काही कामानिमित्त तेथून निघून गेला. तर आशिष व सुशीलकुमार नदीकाठी थांबले होते.संध्याकाळी साधारण ६ वाजण्याच्या सुमारास तीन ते चार अनोळखी युवक तेथे आले. त्यापैकी एकाने सिगारेट पेटवण्यासाठी लाईटर मागितला. आशिषने लायटर दिल्यानंतर ते परत घेताना त्या युवकांमध्ये किरकोळ वाद झाला. हा वाद क्षणात चिघळला आणि आरोपींपैकी एकाने अचानक चाकू काढून आशिषच्या छातीवर व पोटावर वार करण्यास सुरुवात केली. त्याचवेळी दुसऱ्या आरोपीने सुशीलकुमार गेडामच्या पाठीवर चाकूने वार करून त्याला गंभीररीत्या जखमी केले.या हल्ल्यानंतर जखमी सुशीलकुमारने धडपडत फोनकरून सचिन मिश्रा याला घटनेची माहिती दिली. सचिनने त्वरित ११२ वर संपर्क साधून पोलिसांना घटनेची माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन गंभीर जखमी अवस्थेतील आशिष गोंडाणे यांना तातडीने रुग्णालयात दाखल केले. कामठी येथील आशा हॉस्पिटलमध्ये नेल्यानंतर डॉक्टरांनी आशिषला मृत घोषित केले. तर गंभीर जखमी सुशीलकुमारला त्याच्या नातेवाईकांनी मानकापूर येथील मॅक्स हॉस्पिटलमध्ये दाखल केले असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत.आरोपी युवक कोण होते? ते त्या परिसरात काय करत होते? त्यांनी हल्ला का केला? त्यासाठी खापरखेडा पोलिसांनी तपास सुरू केला आहे. परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासत असून लोकांकडून माहिती गोळा केली जात आहे. हल्लेखोरांनी पळ काढल्याने त्यांचा शोध घेण्यासाठी विशेष पथक तयार करण्यात आले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# 'शेर' का होताहेत ढेर? 'गंभीर' कारणं

**गुवाहाटी :** कोलकातामध्ये पहिल्या कसोटीत दक्षिण आफ्रिकेकडून भारताचा लाजिरवाणा पराभव झाल्यानंतर गुवाहाटीतील दुसऱ्या कसोटीत पराभवाचा वचपा काढतील अशी अपेक्षा होती. पण ती अपेक्षा पूर्णपणे फोल ठरली आहे. वचपा तर सोडाच, दुसरी कसोटी वाचवण्याचे म ोठे आव्हान भारतीय 'अष्टपैलू' संघासमोर आहे. कोलकाताच्या 'फिरकी' फ्रेंडली पिचवर शरणागती पत्करणाऱ्या भारतीय फलंदाजांचा गुवाहाटीच्या पाटा पिचवरही निभाव लागू शकलेला नाही. परिणामी पहिल्याच डावात मार्को यान्सेनच्या घातक माऱ्यासमोर भारतीय धुरंधरांनी सपशेल नांगी टाकली. आता भारतावर पराभवाचं सावट आहे.



दक्षिण आफ्रिकेचा वेगवान गोलंदाज मार्को यान्सेन यानं सोमवारी भारताविरुद्ध दुसऱ्या कसोटीच्या पहिल्या डावात घातक गोलंदाजी केली. त्यानं विकेट्सचा षटकार लगावला आणि दुसरा कसोटी सामना भारताच्या हाताबाहेर गेला. यान्सेननं गुवाहाटीच्या बरसापारा क्रिकेट स्टेडियममध्ये १९.५ षटकांत ४८ धावा देत सहा विकेट्स घेतल्या. सामन्याच्या तिसऱ्या दिवशी भारताचा डाव २०१ धावांवर आटोपला. दक्षिण आफ्रिकेनं पहिल्या डावात ४८९ धावांचा डोंगर उभारला होता. पाहुण्या संघाला २८८ धावांची मजबूत आघाडी मिळाली. पण दक्षिण आफ्रिकेनं भारताला फॉलोऑन देणं टाळलं आणि स्वतःच फलंदाजीला येण्याचा निर्णय घेतला.

यान्सेनने गुवाहाटीत फलंदाजीसह गोलंदाजीतही कमाल दाखवली. सहा विकेट्स घेण्यासह त्यानं ९३ धावाही कुटल्या. २५ वर्षांनंतर एखाद्या दक्षिण आफ्रिकेच्या खेळाडूनं कसोटीत सहा विकेट्स आणि ५० पेक्षा अधिक धावा करण्याचा कारनामा केलाय. १९८८ नंतर यान्सेन हा भारतात कसोटी सामन्यात पाच किंवा त्यापेक्षा अधिक विकेट घेणारा तिसरा डाव्या हाताचा वेगवान गोलंदाज ठरला आहे. याआधी झहीर खान यानं तीन वेळा, मिचेल जॉनसन यानं २०१० मध्ये अशी कामगिरी केली होती. एक वेळ अशी होती की, भारताच्या १ बाद ९५ धावा होत्या. त्यानंतर अवघ्या २७ धावांत भारतानं सहा विकेट्स गमावले. बहुतांश फलंदाजांनी चुकीचे फटके मारून आयती विकेट दिली. यशस्वी जयस्वालनं सर्वाधिक ५८ धावा केल्या. तर वॉशिंग्टन सुंदर यानं ४८ धावांची खेळी केली.

दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांनी भारतीय फलंदाजांना मायभूमीतच गारद केले. भारताचे फलंदाज वेगवान माऱ्यासम ोरही तग धरू शकले नाहीत. याशिवाय फिरकीपुढेही त्यांनी नांगी टाकली. भारतीय संघात कसोटी स्पेशालिस्ट नसणे हेही एक कारण आहे. मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यानं कसोटी संघात बॅटिंग स्पेशालिस्टऐवजी ऑलराउंडर्सवर अधिक भरवसा दाखवला. जडेजा, रेड्डी आणि वॉशिंग्टन सुंदर हे तीन ऑलराउंडर संघात आहेत. नितीश रेड्डीचा तर गोलंदाजीतही काही विशेष असा वापर करून घेतला नाही. तर बॅटिंगमध्येही तो फेल ठरला. याआधी स्पेशालिस्ट खेळाडूंवर अधिक भर दिला जात असे. त्याचा फायदाही होत असे. पण आता याउलट होत आहे. ऑलराउंडर्सना गोलंदाजी आणि फलंदाजीतही कमाल दाखवता आलेली नाही. प्रत्येक संघ हा टॅलेंटेड खेळाडू आणि युवा खेळाडूंवर अधिक भरवसा ठेवतो, पण तो किती असावा हे देखील बघणे गरजेचे आहे. विराट कोहली, रोहित शर्मा, अजिंक्य रहाणे आणि चेतेश्वर पुजारासारख्या खेळाडूंना बॅटिंग स्पेशालिस्ट म्हणून ओळखले जायचे. या चारही खेळाडूंनी ८० पेक्षा जास्त कसोटी सामने खेळलेले होते. पण आता ते संघात नसल्यानं युवा खेळाडूंवर ताण आला आहे. क्वलिटी गोलंदाजीसमोर या युवा खेळाडूंचा अनुभव कमी असल्यानं निभाव लागू शकत नाही, असे अनिल कुंबळेसारखे दिग्गज खेळाडूही सांगतात.

सध्याच्या टीम इंडियातील खेळाडू पूर्णपणे टेस्ट स्पेशालिस्ट नाहीत. साई सुदर्शन यानं व्हाइट बॉल क्रिकेटमध्ये धावा केल्या असल्या तरी डोमेस्टिक क्रिकेटचा त्याला खूप काही अनुभव नाही. ध्रुव जुरेल सुद्धा प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये फारसा अनुभवी नाही. वॉशिंग्टन सुंदरबाबतही तेच म्हणावे लागेल. करुण नायर, सरफराज खान, अभिमन्यू ईश्वरनम यांसारख्या खेळाडूंनी भारतीय खेळपट्ट्यांवर खूप धावा केल्या आहेत. पण त्यातील एकही सध्याच्या संघात नाही. त्यामुळे आगामी काळात संघ व्यवस्थापनाला टेस्ट स्पेशालिस्ट फलंदाज हेरावे लागतील, अन्यथा भविष्यात भारतीय कसोटी संघाचा निभाव लागणे कठीण होणार आहे, असेही क्रिकेटमधील तज्ज्ञांकडून सांगितले जात आहे.

## स्मृतीच्या वडिलांची तब्येत बिघडल्याने लग्न पुढे ढकलले

**सांगली :** विश्वचषक विजेत्या भारतीय संघातील महिला क्रिकेटपटू स्मृती मानधना आणि संगीतकार पलाश मुच्छल यांच्या लग्नाच्या दिवशीच स्मृतीचे वडील श्रीनिवास मानधना यांना अचानक छातीत दुखू लागले. त्यांना रुग्णालयात दाखल करावे लागल्यानंतर स्मृती मानधना आणि पलाश यांनी लग्न सोहळा अनिश्चित काळासाठी पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला. मात्र त्याच वेळी स्मृतीने विवाहपूर्वीच्या मेहंदी-हळद-संगीत सोहळ्यांचे फोटोही सोशल मीडियावरुन डिलिट केल्याने नेटिझन्समध्ये उलटसुलट चर्चांना सुरुवात झाली आहे. अशातच स्मृती-पलाशचा विवाह नेमका कधी होणार, या तारखेच्या घोषणेकडे चाहत्यांचे लक्ष लागून राहिलं आहे.स्मृती मानधनाच्या वडिलांना अचानक छातीत दुखू लागल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करावे लागले. यानंतर स्मृती आणि पलाशच्या लग्न सोहळ्याला अचानक ब्रेक लागला. २३ नोव्हेंबर रोजी सांगली येथे होणारे लग्न अनिश्चित काळासाठी पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला. या गोंधळात खुद्द नवरदेव पलाश मुच्छल याचीही तब्येत तणावामुळे खालावली. त्याला सांगलीतील रुग्णालयात दाखल करावे लागले, सुदैवाने काही तासांच्या उपचारानंतर त्याला डिस्चार्ज देण्यात आला. त्यानंतर पलाश आणि त्याचे कुटुंबीय मुंबईला रवाना झाले.दरम्यान पलाशच्या आई अमिता मुच्छल यांनी सांगितले की त्यांचा लेक सध्या विश्रांती घेत आहे. त्याची प्रकृती बरी होत आहे. दोन्ही कुटुंबं गेल्या दोन दिवसांच्या धक्क्यातून सावरण्याचा प्रयत्न करत आहेत. अमिता मुच्छल यांनी सांगितले



की, पलाश हा सासरेबुवा श्रीनिवास म ानधना यांच्याशी अत्यंत जवळचा आहे. कदाचित स्मृतीपेक्षाही जास्त. या घट्ट नात्यामुळेच त्या गोंधळाच्या परिस्थितीत पलाश समंजसपणे निर्णय घेऊ शकला. पलाशला अंकलशी खूप जास्त अटॅचमेंट आहे. स्मृतीपेक्षाही जास्त ते दोघं जवळचे आहेत. जेव्हा त्यांची तब्येत बिघडली, तेव्हा स्मृतीच्या आधी पलाशने निर्णय घेतला, की मला तोपर्यंत सात फेरे घ्यायचे नाहीत, जोपर्यंत अंकल ठीक होत नाहीत.'या क्षणाचं गांभीर्य त्याच्यासाठी इतकं होतं, की तो वारंवार रडत होता. अमिता मुच्छल यांनी वर्णन केलं, की तणावामुळे तो जवळजवळ कोसळला होता. 'हळद लागल्यामुळे आम्ही त्याला बाहेर जाऊ देत नव्हतो. रडता रडता अचानक त्याची तब्येत बिघडली. चार तास त्याला हॉस्पिटलमध्ये ठेवावं लागलं. खत ड्रिप लावली, एउत्र काढला आणखीही काही टेस्ट झाले. सगळं नॉर्मल आलंय, पण स्ट्रेस खूप आहे' डॉक्टरांनी पलाशला काही तास देखरेखेखाली ठेवले. तो भावनिकदृष्ट्या थकून गेला होता. त्यानंतर त्याला मुंबईला परत आणण्यात आले, जिथे तो कुटुंबासोबत विश्रांती घेत आहे.

## धर्मेंद्र यांच्या निधनानंतर सचिन झाला भावूक

**मुंबई :** बॉलीवूडचे दिग्गज अभिनेते धर्मेंद्र देओल यांचे आज दुपारी निधन झाले. बॉलीवूडवर शोककळा पसरली. पण धर्मेंद्र हे फक्त बॉलीवूडपुरतेच मर्यादीत नव्हते, तर ते क्रिकेटचेही चाहते होते. भारताचा महान क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर यांची त्यांनी भेटही घेतली होती. ही भेट अजूनही सचिन तेंडुलकर यांच्या स्मरणात आहे. धर्मेंद्र यांच्या निधनानंतर सचिन तेंडुलकर भावूक झाला आहे आणि त्याने आपल्या लाडक्या अभिनेत्यांसाठी एक खास पोस्ट लिहिली आहे.धर्मेंद्र यांचे निधन झाले आणि काही वेळातच बऱ्याच क्रिकेटपटूंनी आपल्या भावना व्यक्त केल्या, पण या सर्वांमध्ये सचिन तेंडुलकर यांची पोस्ट जोरदार व्हायरल होत आहे. कारण सचिन तेंडुलकर यांनी धर्मेंद्र यांच्याबरोबर झालेल्या भेटीला उजाळा दिला आहे. त्याचबरोबर धर्मेंद्र यांनी या भेटीत आपल्याला नेमकं काय सांगितलं होतं, हेदेखील सचिन यांनी आपल्या या पोस्टमध्ये लिहिले आहे.सचिन यांनी धर्मे द्र यांच्याबाबत लिहिले आहे की, ' काही अभिनेते तुम्हाला लगेचच आवडतात, माझ्यासाठी असे धर्मेंद्रजी होते. धर्मेंद्रजी यांच्या बहुमुखी प्रतिभेने आपल्या सर्वांचे मनोरंजन केले. जेव्हा मी त्यांना भेटलो तेव्हा पडद्यावरील हे बंधन पडद्याबाहेर अधिक घट्ट झाले. कारण त्यांची भेट घेणं हा एक सोहळा होता. धर्मे द्र यांना भेटल्यावर एक खास उर्जा माझ्या अंगात भिनली होती.



त्यांचे व्यक्तिमत्व असे होते की, ते तुम्हाला लगेच आपलेसे करत होते. धर्मेंद्रजी यांच्या सहवासात एक सहजता होती, त्यांच्या सहवासात एक अशी ताकद होती की, ते आपलेसे वाटायचे. ते एक दिग्गज अभिनेते होते, पण त्यांनी ही गोष्ट कधीही जाणवू दिली नाही. धर्मेंद्रजी यांच्या सहवासात बऱ्याच गोष्ट शिकण्यासारख्या होत्या. मी जेव्हा त्यांना प्रथम भेटलो तेव्हा ते मला म्हणाले होते की, 'तुमको देखकर एक किलो खून बढाई है मेरा.' धर्मेंद्रजी यांच्या जाण्यामुळे एक पोकळी निर्माण झाली आहे, त्यांच्या निधनाची वृत्त ऐकून माझे हृदय जड झाले आहे. ऐसा लगता है जैसे मेरा १० किलो खून कम हो गया है. तुमची आठवण मला कायम येईल.'

## पृथ्वी शॉला थेट कॅप्टनसी करण्याची संधी

**मुंबई :** दक्षिण आफ्रिकेविरुद्ध भारतीय संघ कसोटी मालिका खेळत आहे. आता त्यानंतर एकदिवसीय मालिका खेळताना दिसेल. एकदिवसीय मालिकेसाठी भारताचा संघ जाहीरही झाला आहे. दोन वर्षांनी ठीींीरक्ष ऋळज्ञुरव भारतीय एकदिवसीय संघात स्थान देण्यात आले. खपवळर ीी डेंींह अषीळलर यांच्यातील तीन साम न्यांच्या एकदिवसीय मालिकेसाठी त्याची निवड झाली. या निर्णयाचा झीळींहुल डहरु फायदा झाला.भारतीय संघाचा कसोटी आणि वनडे कर्णधार शुभमन गिल मानेच्या दुखापतीमुळे संघा बाहेर आहे. शुभमनला दुखापतीतून सावरण्यासाठी अजून थोडा वेळ लगाणार असल्यामुळे वनडे संघात त्याला स्थान मिळाले नाही. तर श्रेयस



अय्यरलाही दुखापतीतून सावरण्यासाठी अजून थोडा वेळ लागणार असल्यामुळे काही काळ पुनरागमनासाठी लागू शकतो. आता त्यामुळे संघात अनेक खेळाडूंचे पुनरागमन झाले आहे.टीम इंडियामध्ये ऋतुराज गायकवाडचे दोन वर्षानंतर पुनरागमन झाले. वृत्तानुसार, महाराष्ट्र निवड समिती आणि संघ व्यवस्थापनाने शॉला गरज पडल्यास कर्णधारपदाची जबाबदारी स्वीकारण्याची शक्यता आधीच कळवली आहे आणि सलामीवीर फलंदाजाला या भूमिकेसाठी तयार राहण्याचा सल्ला देण्यात आला आहे. पृथ्वी शॉसाठी ही खूप चांगली बातमी आहे, कारण जर म हाराष्ट्र संघ त्याच्या नेतृत्वाखाली चांगली कामगिरी करत असेल आणि तो स्वतः धावा काढत असेल तर तो आयपीएलम ध्ये परतू शकतो.गेल्या हंगामात पृथ्वी शॉला कोणत्याही संघाने खरेदी केले नव्हते. गेल्या वर्षी शॉला मुंबई संघातून वगळण्यात आले होते. त्यानंतर त्याने दुसऱ्या राज्य संघटनेकडून खेळण्याचा निर्णय घेतला.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# सुपरस्टार धर्मेंद्र काळाच्या पडद्याआड..

## तब्बल ६ दशकं हिंदी सिनेसृष्टीत अधिराज्य गाजवणाऱ्या धर्मेंद्र यांच्या निधनाने मोठी पोकळी

**मुंबई :** बॉलिवूडचे लोकप्रिय अभिनेते धर्मेंद्र यांचे निधन झाले आहे. वयाच्या ८९ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. आयएएनएसने याबाबतचे वृत्त दिले आहे. गेल्या काही दिवसांपासून धर्मेंद्र यांची प्रकृती चिंताजनक होती. मुंबईमधील राहत्या घरी धर्मेंद्र यांचे निधन जाले. त्यांच्या जाण्याने चित्रपटसृष्टीत मोठी पोकळी निर्माण झाली आहे. धर्मेंद्र यांनी अनेक दशके प्रेक्षकांचे मनोरंजन केले. तब्बल ६ दशकं सिनेसृष्टीवर राज्य करणारा कोहिनूर हरपल्यानं हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. बॉलिवूड अभिनेते धर्मेंद्र यांच्या निधनानं अख्खं बॉलिवूड शोकसागरात बुडालं आहे. विले पार्ले येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार होणार आहेत. अमिताभ बच्चन, आमिर खान यांच्यासह बॉलिवूडमधील अनेक कलाकार अंत्यसंस्कारासाठी पोहचले आहेत.

मुंबईतील ब्रीच कँडी हॉस्पिटलमध्ये धर्मेंद्र यांच्यावर काही दिवसांपूर्वी उपचार सुरू होते. काही दिवसांपासून श्वसनासंबंधी त्रास जाणवत होता. त्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. काही दिवसानंतर त्यांच्या प्रकृतीत सुधारणा झाली होती. त्यामुळे




त्यांच्यावर घरीच उपचार सुरू होते. २४ नोव्हेंबर रोजी धर्मेंद्र यांची प्राणज्योत मालवली. धर्मेंद्र यांच्या पश्चात त्यांच्या पत्नी प्रकाश कौर आणि हेमा मालिनी, तसेच सहा मुलं, अभिनेता सनी देओल, बॉबी देओल, ईशा देओल, अहाना देओल आणि मुली अजीता व विजेता असा परिवार आहे.

६ दशकांहून अधिक काळ हिंदी चित्रपटसृष्टीवर अधिराज्य गाजवणाऱ्या धर्मेंद्र यांनी मागे अपूर्व असे कार्य सोडले आहे. त्यांच्या निधनाने भारतीय चित्रपटसृष्टीतील एक सुवर्ण युग संपल्याची भावना सिनेसृष्टीत व्यक्त केली जात आहे. २५ डिसेंबरला प्रदर्शित होणारा 'इक्कीस' हा त्यांचा शेवटचा चित्रपट ठरणार आहे.

धर्मेंद्र यांचा जन्म ८ डिसेंबर १९३५ रोजी पंजाबमधल्या कपूरथला जिल्ह्यात झाला होता. त्यांचं शिक्षण फगवाडा इथल्या आर्य हायस्कूलमध्ये झालं. धर्मेंद्रचं शिक्षण हे मॅट्रिकपर्यंत झालं होतं. त्यानंतर ते रेल्वेमध्ये क्लर्क म्हणून नोकरीलाही लागले. पण सिनेमाची,अभिनयाची आवड असल्यानं त्यांनी ती नोकरी सोडली. त्यांनी फिल्मफेअरच्या स्पर्धेत भाग घेतला अनब त्यानंतर त्यांचं आयुष्य बदललं.

१९६० मध्ये 'दिल भी तेरा हम भी तेरे' या चित्रपटातून त्यांनी बॉलिवुडमध्ये पदार्पण केले. त्यांच्या 'फूल और पत्थर', 'यादों की बारात', 'मेरा गाँव मेरा देश', 'नौकर बिवी का', 'बेताब', 'घायल' यांसारख्या अनेक चित्रपटांनी हिंदी सिनेमाला नवे आयाम दिले. २०१२ मध्ये त्यांना भारत सरकारकडून पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पंजाबमधील लुधियाना जिल्ह्यातील खेडेगावात धर्मेंद्र केवाल कृष्ण देओल या नावाने जन्मलेल्या या अभिनेत्याने १९ वर्षांचे असताना प्रकाश कौर यांच्याशी विवाह केला. नंतर चित्रपटसृष्टीत आल्यानंतर त्यांची ओळख हेमा मालिनी यांच्याशी झाली आणि दोघांनी विवाह केला. वयाच्या उत्तरार्धातही धर्मेंद्र सोशल मीडियावर सक्रिय होते. नैसर्गिक जीवनशैली, शेती, आरोग्य आणि साध्या जीवनातील आनंदाबद्दल ते चाहत्यांशी शेअर करत असत. ट्रॅक्टर चालवत किंवा शेतात काम करतानाचे त्यांचे व्हिडिओ लोकप्रिय ठरले होते.

### अमिताभ बच्चन यांची भावनिक पोस्ट..



X वर अमिताभ बच्चन यांनी आपल्या मित्र धर्मेंद्रसाठी काही खास लिहिलं आहे. ते म्हणतात, "एक आणखी दिग्गज आपल्याला सोडून गेलाय..तो जणू एक मैदान रिकामं करून गेलाय.. मागे अशी शांतता ठेवून गेला जी सहन करणं अशक्य आहे. धरमजी, महानतेचे उदाहरण, जे केवळ त्यांच्या शारीरिक उपस्थितीसाठीच नाही तर त्यांच्या मोठ्या मनासाठी आणि साधेपणासाठी सर्वांच्या नेहमी लक्षात राहतील. ते पंजाबच्या गावातून आले होते, ते तिथल्या मातीप्रमाणे असून त्याच स्वभावाशी प्रामाणिक राहिले. त्यांच्या उत्तम करियरमध्ये प्रत्येक दशकात बदल झाले. मात्र त्यांच्यात कधीही बदल झाला नाही. त्यांचं स्मितहास्य, त्यांचा चार्म आणि त्यांची आपुलकी, जे त्यांच्या आसपास येणाऱ्या प्रत्येकाला जाणवलं. आपल्या आसपास आता एक पोकळी निर्माण झाली आहे जी कायमची राहील.

# महाकुंभची महाझलक, बालकृष्ण नव्या अवतारात

## अखंडा भाग २ चा ट्रेलर रिलीझ..

**मुंबई :** प्रसिद्ध अभिनेता नंदमुरी बालकृष्णचा यावर्षीचा सर्वात मोठा चित्रपट 'अखंडा २' चा ट्रेलर रिलीज झाला आहे. फॅन्स या चित्रपटाच्या ट्रेलर खूप पसंती देताहेत. ट्रेलरमध्ये सनातन हिंदू धर्मच्या शक्तीवर जोर देण्यात आला आहे. विशेष म्हणजे महाकुंभची प्रचंड झलक यामध्ये पाहायला मिळत आहे. चित्रपटाची रिलीज डेट देखील समोर आलीय.

नंदमुरी बालकृष्ण आणि ब्लॉकबस्टर मेकर बोयापति श्रीनुचा धार्मिक ॲक्शन चित्रपट 'अखंडा २: थांडव' लवकरच जगभरात रिलीज होणार आहे. टीमने चित्रपटाच्या प्रचारासाठी मोठ्या स्तरावर संपूर्ण देशात मोहीम चालवली आहे. १४ रील्स प्लस बॅनर अंतर्गत राम अचंता आणि गोपिचंद अचंता यांनी चित्रपट बनवला आहे तर एम तेजस्विनी नंदमुरी प्रस्तुत करत आहेत.

साऊथचा पॉवरस्टार नंदमुरी बालकृष्ण पुन्हा एकदा एनर्जेटिक अवतारात मोठ्या पडद्यावर अवतरण्याची तयारी करत आहे. ट्रेलरमध्ये त्यांचा नवा अवतार अत्यंत प्रभावी दाखवण्यात आला आहे, कधी रुद्रावतार, तर कधी शांत संतस्वरूप. विशेष म्हणजे, या वेळी कथा महाकुंभातील अंधाऱ्या शक्तींचा नायनाट करण्यासाठी सुरू झालेल्या संघर्षाभोवती फिरते असे दिसते.

ट्रेलरमध्ये दाखवलेली गर्दी, नदीकाठचा



महाआरती सोहळा, ध्वनी-प्रकाशाची खेळी आणि धार्मिक वातावरण यामुळे चित्रपटाचा स्केल किती प्रचंड आहे हे स्पष्ट होते. दिग्दर्शकांनी एकाच वेळी अध्यात्म, भक्ती, ॲक्शन आणि ड्रामा एकत्र आणण्याचा प्रयत्न केला आहे.

बेंगलोरमध्ये चित्रपटाचा टीझर रिलीज करण्यात आला. त्यावेळी कन्नड स्टार शिव राजकुमार उपस्थित होते. ट्रेलरची सुरुवात एका चिथावनीने होते. 'अखंडा २' च्या ट्रेलरमध्ये म्हटलं गेलंय की, 'लेकिन जब श्रद्धा डगमगाने लगती है, तब एक शक्तिशाली ताकत उठती है। वह है अखंडा, जो दिव्य आग की तरह प्रकट होता है और विरोधियों के खिलाफ लड़ने के लिए तैयार होता है।'

# लग्नाच्या विषयावर मुक्ता बर्वे नेमकं काय म्हणाली?

## सोशल मीडियावर 'त्या' वक्तव्याची चर्चा..

**पुणे :** मराठमोळी अभिनेत्री मुक्ता बर्वे सध्या तिचा चित्रपट 'असंभव'मुळे चांगलीच चर्चेत आहे. आजवर तिने अनेक हिट चित्रपट, मालिका आणि नाटकांमध्ये काम केले आहे. तिच्या अभिनयाचे चाहते दिवाने आहे. नुकतेच एका मुलाखतीत लग्न, रिलेशनशिप यावर स्पष्ट मत मांडले आहे. ज्याची सोशल मीडियावर तुफान चर्चा पाहायला मिळत आहे. लग्नाबद्दल बोलताना मुक्ता म्हणाली, 'मला एकटं राहायला आवडतं...'

लग्नासाठी इच्छुक मुलांना त्यांच्यापेक्षा यशस्वी, जास्त पैसे कमावणारी, समाजात मोठं नाव कमावलेली मुलगी नको असत. कारण घरीच स्पर्धा सुरू होता. तुला असा कधी अनुभव आला आहे का? असा प्रश्न मुलाखतीत विचारण्यात आला तेव्हा मुक्ता बर्वे म्हणाली की, 'नाही. मी लग्नच नाही केले. रिलेशनशिपमध्ये अशा अडचणी येत नाहीत. आधी लग्न संस्थेत असा सगळा गोंधळ होता. आता नसेल कदाचित कारण प्रत्येक जण नवीन शिकत आहे. नोकऱ्या सोडतात आणि नवीन शिकतात. कामातून ब्रेक घेतात. तसेच काही जोडप्यांमध्ये एक पैसे कमावतो तर काही आपले छंद जोपासताना दिसतो. असे दृश्य काही ठिकाणी दिसते. मी रिलेशनशिपमध्ये असताना असे काही झाले नाही. '




एकटेपणा बद्दल बोलताना मुक्ता म्हणाली, 'मला एकटं राहायला आवडतं. कारण मला माझी कंपनी खूप आवडते. मला एका वेळेनंतर कारमध्ये ड्रायव्हरही नको असतो. एकटेपणा हा प्रत्येकाच्या स्वभावानुसार असतो. मी माझ्या कामात खूप गुंतलेली असते. काम करताना मला मजा येते. मी ज्या क्षेत्रात आहे तिथे माझ्या आजूबाजूला अनेक माणसे असतात. त्यांना बोलायला, मतं मांडायला आणि व्यक्त व्हायला खूप आवडते. पण मला एकटं राहायला आवडते. मी ब्रेक घेते. फिरायला जाते. भरपूर वाचन करते. मला जास्त गप्पा मारायला आवडत नाही. म्हणून मी घरी असते. मी छंड जोपासते. सीरिज, सिनेमा पाहते. 'असंभव' हा थरारक आणि रहस्यमय चित्रपट २१ नोव्हेंबर २०२५ ला थिएटरमध्ये रिलीज झाला आहे. 'असंभव'चे दिग्दर्शन सचित पाटीलने केले असून पुष्कर श्रोत्री यांनी सह-दिग्दर्शनाची जबाबदारी सांभाळली आहे. सचित पाटील, मुक्ता बर्वे, प्रिया बापट आणि संदीप कुलकर्णी या चित्रपटात मुख्य भूमिकेत झळकले आहेत. मुक्ता बर्वेच्या डोळ्यांतील भीती- शोध, प्रिया बापटचे गूढ व्यक्तिमत्त्व, सचित पाटीलचा उत्तरांच्या शोधात असलेला प्रवास यामुळे चित्रपट अधिकच रहस्यमय होत जातो.

***

# अचानक बिबट्या समोर आल्यास काय करावे? वनविभागाच्या या ५ महत्त्वाच्या सूचना लक्षात ठेवा...

**जनसंचलन/बुलढाणा**

राज्यातील ग्रामीण भागात गेल्या काही दिवसांपासून बिबट्यांच्या हालचाली वाढल्या असल्याच्या घटना वारंवार समोर येत आहेत. काही ठिकाणी तर बिबट्याचे हल्लेही झाले असून ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण आहे. अशा परिस्थितीत अचानक हा हिंस्र प्राणी समोर आला तर स्वतःचा जीव वाचवण्यासाठी काय करावे हा महत्त्वाचा प्रश्न आहे. यासाठीच वन विभागाने नागरिकांना काही आवश्यक आणि प्रात्यक्षिक सूचना दिल्या आहेत. शेतात आणि घराजवळ सतर्कता आवश्यक : शेतकरी सध्या रब्बी हंगामात शेतात पाणी देण्यासाठी रात्रीच्या वेळी बाहेर पडतात. त्यामुळे रात्रीच्या वेळी शेतात जाणाऱ्यांनी सतर्क राहणे अत्यंत गरजेचे असल्याचे वन विभाग सांगत आहे. शेतात जाताना मोबाईलवर आवाज, गाणी किंवा कोणताही सतत आवाज सुरू ठेवावा, जेणेकरून बिबट्या आवाज टाळून दूर जाईल. तसेच काठी सोबत बाळगावी आणि त्या काठीला घुंगरू बांधावे. शेतात काम करत असताना जमिनीवर बसून काम न करण्याचा सल्ला वनविभागाने दिला आहे. बसलेल्या अवस्थेत माणूस बिबट्याला लहान प्राण्यासारखा दिसतो आणि त्यामुळे हल्ला होण्याची शक्यता अधिक असते. लहान मुले आणि वृद्ध व्यक्तींनी दिवस मावळल्यानंतर घराबाहेर पडणे टाळावे, कारण बिबट्याची नजर सहसा कमी उंचीवर असते आणि त्याला मुले हे त्याचे शिकार असल्याचा भास होऊ शकतो. बिबट्या दिसल्यास काय करू नये आणि काय करावे?अचानक बिबट्या समोर आला तर धावून पळू नये. पळाल्यास प्राणी पाठलाग करून हल्ला करण्याची शक्यता जास्त असते. त्याऐवजी स्वतः ला मोठे दाखवत दोन्ही हात वर करावेत आणि सावकाश मागे सरकावे. झुडपात लपण्याचा किंवा




बसण्याचा प्रयत्न करणे धोकादायक ठरू शकते. वन विभागाने स्पष्टपणे सांगितले आहे की अशा घटना दिसल्यास नागरिकांनी घाबरून न जाता तात्काळ वनविभागाशी संपर्क साधावा.दरम्यान, जालना जिल्ह्यातील बाजी उमरद आणि तीर्थपुरी परिसरात बिबट्याच्या हालचाली आढळून आल्या आहेत. त्यामुळे स्थानिक प्रशासन आणि वन विभाग नागरिकांना सतर्क राहण्याचे आणि दिलेल्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन करत आहे.

# रेल्वे रुळावर पाण्याची जीर्ण टाकी कोसळली; हानी नाही!

**जनसंचलन/जलंब**

रेल्वे स्टेशनजवळील जीर्ण अवस्थेतील पिण्याच्या पाण्याची टाकी २४ नोव्हेंबर रोजी दुपारी सुमारे चार वाजता अचानक रेल्वे रुळावर कोसळली. या घटनेत खामगाव-जलंब लोहमार्गावरील विद्युत तारांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. परिणामी या मार्गावरील रेल्वे वाहतूक काही काळासाठी विस्कळीत झाली होती. या दुर्घटनेमुळे रेल्वेची एक फेरी रद्द करण्यात आल्याची माहिती मिळाली आहे. अपघातानंतर तात्काळ मनुष्यबळ तैनात करून दुरुस्तीची कामे सुरू करण्यात आली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही, ही दिलासादायक बाब आहे. दरम्यान, ही घटना ठेकेदाराच्या १ फेरी रेल्वेची रद्द करण्यात आल्याची माहिती आहे. हलगर्जीमुळे घडल्याची माहिती स्थानिक सूत्रांकडून मिळत असून, याबाबत अधिक चौकशी सुरु आहे. टाकी पाडण्याचे कंत्राट देण्यात आले होते का, याबाबत अद्याप स्पष्ट माहिती मिळू शकली नाही.




# दैनिक जनसंचलन सिटी न्यूज व हॅलो बुलढाणाच्या प्रकाशपर्व या दिवाळी विशेषांक अंकाचे विमोचन प्रमुख पाहुण्याच्या हस्ते...



# धनादेश अनादर प्रकरणी एकास मिळाली सश्रम कारावास शिक्षा..

**जनसंचलन/बुलढाणा**

फिर्यादी गजानन साहेबराव खंदारे यांचेकडून आरोपी शेख शफीक शेख मो. बागवान यांनी माहे जुन २०१९ मध्ये फळ विकत घेण्याकरिता रु.१,००,०००/- हात उसने रक्कम घेतली होती व सदर रक्कम ही दि. ०७/१२/२०१९ रोजी परत करण्याचे वचन आरोपीने फिर्यादीस दिले होते. त्या रकमेच्या परतफेडी पोटी आरोपीने त्याचे नावे असलेला आयसीआयसीआय बँक शाखा बुलडाणा चा धनादेश क्र.०३३४१८ दि.३०/१२/२०१९ रक्कम रु.१,००,०००/- हा फिर्यादीस दिला. परंतू धनादेश वटविण्याइतपत रक्कम आरोपीच्या खात्यात नसल्याने फिर्यादीने त्यांचे वकिलामार्फत आरोपीस नोटीस पाठविली परंतू आरोपीने धनादेशाची पूर्तता केली नाही. त्यामुळे नाईलाजास्तव फिर्यादीने आरोपीविरुध्द निगोशिएबल इन्स्टुमेंट ॲक्ट १३८ अन्वये मा.अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्र.२) बुलडाणा येथे सं. फौ. ख.क्र.२५५/२०२० हे दाखल केले. त्यानुसार मा. मंदार प्र.पांडे, अति. मुख्य न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्र.२) बुलडाणा यांनी प्रस्तुत प्रकरणात आरोपीस, पराक्रम्य संलेख अधिनियम, १८८१ चे कलम १३८ अन्वये परिभाषीत व दंडनीय गुन्ह्यात दोषी धरुन ०३ महिन्यांचा सश्रम कारावास तथा रक्कम रु.२,००,०००/- (दोन लाख रु.) द्रव्य दंडाची शिक्षा तथा त्याने द्रव्य दंडाचा भरणा न केल्यास ०१ (एक) महिना साध्या कारावासाची शिक्षा भोगावी असे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५५ (२) प्रमाणे तथा परक्राम्य संलेख अधिनियमाचे कलम १४३ अन्वये ठोठावण्यात येते. आरोपीकडून उपरोक्त दंडाची रक्कम रु.२,००,०००/- वसूल झाल्यावर फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३५७ (१) (ब) नुसार ती संपूर्ण रक्कम फिर्यादीस देण्यात यावी व आरोपीने त्याचे जामिनास अभ्यार्पित व्हावे, असे आदेश दि. ०४/११/२०२५ रोजी पारीत केले आहे. फिर्यादी तर्फे ॲड. संजीव रमेश बेंडवाल यांनी काम पाहले आहे.



# कार-दुचाकी अपघातात एक ठार, एक गंभीर

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

शहरापासून काही अंतरावर असलेल्या लभाण देव मंदिराजवळ सोमवारी दुपारी बारा वाजताच्या सुमारास झालेल्या कार-दुचाकी अपघातात एक वृद्ध ठार तर एक जण गंभीर जखमी झाला. वळणावर कार चालकाने केलेल्या बेफिकीरीमुळे अपघात झाल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. देऊळगाव राजा तालुक्यातील जवळखेड येथील तुकाराम अर्जुन गवई (७०) आणि विनोद शिवाजी गवई हे सावखेड तेजन फाट्याकडे दुचाकीने जात होते. लभाण देव मंदिराजवळील वळणावर मेहकरकडून येणाऱ्या (एमएच ४७ के २२१९) या क्रमांकाच्या कारने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता इतकी होती की, तुकाराम गवई यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला, तर विनोद गवई गंभीर जखमी असून, त्यांना तातडीने छत्रपती संभाजीनगर येथील रुग्णालयात हलविण्यात आले आहे. घटनेची नोंद सिंदखेडराजा पोलिसांनी घेतली असून, पुढील तपास सुरू आहे.




# अवधा बु. येथे युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

**जनसंचलन/ निमगाव**

नांदुरा तालुक्यातील निमगाव येथून जवळच असलेल्या अवधा बुद्रुक येथे एका युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना सोमवारी (दि. २४) सकाळी अंदाजे ५:३० वाजेच्या सुमारास घडली. मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, मृत करण संजय तेलंग (वय २३ वर्षे) हा दीर्घकाळाच्या आजाराला कंटाळला होता. याच कारणामुळे त्याने स्वतःच्या घराशेजारील चिंचेच्या झाडाला गळफास लावून आपले जीवन संपवल्याचे तक्रारीत सांगण्यात आले. तो मृत अवस्थेत लटकलेला आढळून आला. मृताची मानसिक स्थिती ठीक नसल्याकारणाने खामगाव येथील डॉक्टरांकडे त्याचे उपचार सुरू होते, असेही तक्रारीत २३ वर्षीय युवक दीर्घ आजाराला कंटाळला होता सांगण्यात आले आहे. मृताच्या वडिलांच्या तक्रारीवरून तोंडी नांदुरा पोलिस ठाण्याचे पोलिस कर्मचारी वराडे यांनी या घटनेची आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. घटनेचा पुढील तपास सहायक फौजदार इंगळे यांच्याकडे सोपवण्यात आला आहे

